# माझे प्रेम

माझे तुजवर किती प्रेम आहे याला नाही मोजमाप
प्रेमगीत माझे उंच, खोल, आणि दूरवर घेते आलाप

पोहोचते माझे प्रेम एका अदृश्य विश्वावर
जे आहे अथांग, अनंत आणि अतिसुंदर

प्रेम करते मी तुजवर प्रत्येक जिवंत क्षणी
सूर्यप्रकाशात संध्याछायेत जे गातात गाणी

सत्वशीलांच्या नम्रतेसारखे प्रेम माझे निर्मळ
प्रार्थनेने लाभणाऱ्या समाधानासम प्रेम माझे निखळ

माझ्या पुरातन दुःखांना दूर करण्याच्या उत्कटतेने
प्रेम करते मी बालपणीच्या निरागस भरवशाने

गतकालीन स्नेही-सुहृदांवर केले जिवापाड तसेच
प्रेम वसते माझे तुझ्यावर प्रत्येक श्वासामधेच

प्रत्येक स्मित प्रत्येक अश्रू .. प्रेममय माझे जीवन
प्राण गेला तरीही तुजवर माझे प्रेम राहील चिरंतन

"How do I love thee?" by Elizabeth Barrett Browning
Translated by Abhay B. Joshi and Milind A. Toro